<u>राज्य व जिल्हास्तरावरील युवा पुरस्कार.</u>
निधी वितरणाबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : निविप्र २०१८/प्र.क्र.२१७/क्रीयुसे -३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
तारीख : २९ मार्च, २०१९.

<u>वाचा:-</u>

१) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.युकयो २०१२/प्र.क्र.६५/क्रीयुसे-३ दि.१२ नोव्हेंबर, २०१३.
२) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.२५/१/२०१९.
३) क्रीडा व युवक सेवा, पुणे यांचे पत्र क्रमांक.निधी वितरण/योजना-५५६४/२०१८-१९/का-१०, दि.२५ फेब्रुवारी, २०१९.

<u>प्रस्तावना: -</u>

शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.युकयो २०१२/प्र.क्र.६५/क्रीयुसे-३ दि.१२ नोव्हेंबर, २०१३ अन्वये महाराष्ट्र राज्यातील/जिल्ह्यातील युवांनी केलेल्या समाजहिताच्या कार्याचा गौरवा व्हावा व युवा विकासाचे कार्य करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी प्रतिवर्षी राज्य व जिल्हा स्तरावर युवा पुरस्कार देण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे. सन २०१७-१८ मध्ये सदर उपक्रमाकरीता रु.३४.०८ लक्ष इतका अर्थसंकल्पित निधी खर्ची टाकण्यात आला आहे. सन २०१८-१९ या कालावधीत प्रस्तुत योजनेच्या अंमलबजावणीकरिता रु.४८.६८ लक्ष इतकी तरतुद अर्थसंकल्पित करण्यात आलेली आहे. युवा पुरस्कार योजनेच्या प्रचलित शासन निर्णयाचे सुधारीत निकष तयार करण्याकरीता समिती गठीत करण्यात आली असून निकष तयार करण्याची प्रक्रिया सुरु आहे. त्यामुळे जो पर्यंत सुधारीत शासन निर्णयास मंजूरी प्राप्त होत नाही. तोपर्यंत राज्यस्तर युवा पुरस्काराचे आयोजन करता येणार नाही. सबब राज्यस्तर युवा पुरस्काराचे आयोजन वगळता सन २०१८-१९ साठी रु.४८.६८ लक्ष इतक्या अर्थसंकल्पित तरतुदीपैकी फक्त जिल्हास्तर युवा पुरस्काराच्या वितरणासाठी रु.२५,२०,०००/- (रु.पंचवीस लक्ष वीस हजार फक्त) इतक्या निधीच्या वितरणास मान्यता देण्याची बाब या नस्तीच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

सन २०१८-१९ या वर्षाकरीता महाराष्ट्र राज्यातील/जिल्ह्यातील युवांनी केलेल्या समाजहिताच्या कार्याचा गौरवा व्हावा व युवा विकासाचे कार्य करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी प्रतिवर्षी राज्य व जिल्हा स्तरावर युवा पुरस्कार देण्यासाठी रु. ४८.६८ लक्ष एवढा निधी अर्थसंकल्पित आहे. त्यापैकी फक्त जिल्हास्तर युवा पुरस्काराच्या वितरणासाठी रु. २५,२०,०००/- (रु.पंचवीस लक्ष वीस हजार फक्त) इतकी तरतूद वितरीत करण्यास व सदर रक्कम आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्या अधिनस्त ठेवण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त संदर्भात होणारा खर्च "मागणी क्रमांक : ई-३, २२०४ क्रीडा व युवक सेवा-१०३, (१०)(१०) युवा धोरणांतर्गत युवा पुरस्कार (२२०४ ५५६४) ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशिर्षाखालील मंजूर तरतूदीमधून भागविण्यात यावा. सदरचे अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले आहेत त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात यावे.

३. वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि.२५/०१/२०१९ च्या परिपत्रकातील सूचनानूसार उपरोक्त तरतूद खर्च करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. यासाठी संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांना आंहरण व संवितरण अधिकारी तर आयुक्त (क्रीडा)यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि.२/४/२०१८ च्या परिपत्रकातील सूचनांना अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे. सदर परिपत्रकाच्या परिशिष्टातील अनुक्रमांक ८ मध्ये नमुद अटींची पूर्तता होत आहे. सदर परिपत्रकाच्या परिशिष्टातील मुद्दा क्र. १,२,३,४,५,६ व ७ मधील बाबी सदर आदेशास लागू नाहीत.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२९१५४४३७००२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2019.03.29 15:47:12 +05'30'

(राजेंद्र पवार)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा)यांचे खाजगी सचिव
२. मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
५. महालेखापाल (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
६. वरीष्ठ कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, पुणे.
७. वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई.
८. लेखाधिकारी, क्रीडा व युवक सेवा, पुणे.
९. सर्व उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा (संचालनालयामार्फत)
१०. सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (संचालनालयामार्फत)
११. निवडनस्ती, क्रीयुसे-३.